SAMPLE CONTENT

Perfect Notes

# मराठी सुलभभारती

Build Powerful Concepts



इयत्ता सातवी


(Eng. Med.)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित नवीन अभ्यासक्रमावर आधारित.

# इयत्ता सातवी

# मराठी सुलभभारती




Printed at: **Quarterfold Printabilities,** Navi Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 13799**

P.O. No. 201919

# प्रस्तावना

नमस्कार,

शिक्षण मंडळाने नियोजित केलेला इयत्ता ७ वी 'सुलभभारती'चा अभ्यासक्रम पूर्वीच्या तुलनेत फार कल्पक व मुलांच्या संकल्पना अधिक स्पष्ट करणारा आहे. याच CCE अभ्यासपद्धतीवर आधारित **टार्गेट प्रकाशनाचे इयत्ता ७ वी सुलभभारती** हे पुस्तक मुलांच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे.

पाठाचे उत्तम आकलन व्हावे यासाठी या पुस्तकात सर्व पाठांचा इंग्रजीमध्ये सारांश, तर सर्व कवितांचा इंग्रजीतून भावार्थ दिला आहे. शब्दार्थ, वाक्प्रचार व टिपा यांचाही इंग्रजीतून अर्थ दिल्याने पाठांचा अर्थ समजणे मुलांसाठी सोपे होईल.

या पुस्तकात प्रत्येक पाठाचे संकलित मूल्यमापन व आकारिक मूल्यमापन यांत विभाजन केले आहे. संकलित मूल्यमापन विभागात विविध प्रकारचे प्रश्न समाविष्ट केले असून, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारे प्रश्न आकारिक मूल्यमापन विभागात अंतर्भूत केले आहेत. पाठाच्या ओघानुसार प्रश्नांचा क्रम व नावीन्यपूर्ण, कल्पक असे उपक्रम ही या पुस्तकाची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. शक्य तेथे हे उपक्रम सोडवून दिले आहेत, तर काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनार्थ टीप दिली आहे.

व्याकरणाचा स्वतंत्र विभाग देण्यात आला आहे; ज्यामध्ये नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद यांची थोडक्यात उजळणी करून पुढे अव्ययांचे चार मुख्य प्रकार व त्यांचे उपप्रकार यांचे स्पष्टीकरण दिले आहे. उपसर्ग, विरामचिन्हे, लेखननियम यांचाही या विभागात समावेश केला आहे. सरावासाठी मुबलक प्रश्न यामध्ये दिले आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचा व्याकरण अभ्यास परिपूर्ण होण्यास मदत होईल.

लेखन विभागात विविध विषयांवर आधारित लेखन, पत्रलेखन, कथालेखन व आकलनाचे विविध लेखनप्रकार यांचा समावेश केला आहे. या विभागामुळे विद्यार्थ्यांना उत्तमप्रकारे लेखनकौशल्य आत्मसात करता येईल. सर्वांत शेवटी टप्पा येतो तो आपली तयारी जोखण्याचा. त्यासाठी दोन सत्रांत परीक्षांच्या प्रश्नपत्रिका पुस्तकात अंतर्भूत केल्या आहेत. स्वयंमूल्यमापनासाठी त्या विद्यार्थ्यांना निश्चित साहाय्यकारी ठरतील.

मुलांना मराठीची गोडी लावण्यात हे पुस्तक यशस्वी झाले, तर आमचे प्रयत्न सार्थकी लागल्याचे समाधान मिळेल. हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तरी आपल्या काही सूचना असल्यास स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-पत्त्यावर पाठवा: mail@targetpublications.org

अभिनव अभ्यासासाठी मुलांना खूप खूप शुभेच्छा !

प्रकाशक

**आवृत्ती:** द्वितीय

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'Marathi Sulabhbharati; First Edition: 2017' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

SAMPLE CONTENT

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १. | प्रार्थना | जगदीश खेबूडकर | १ |
| २. | श्यामचे बंधुप्रेम | साने गुरुजी | ४ |
| ३. | माझ्या अंगणात (कविता) | ज्ञानेश्वर कोळी | ११ |
| ४. | गोपाळचे शौर्य | लक्ष्मीकमल गेडाम | १७ |
| ५. | दादास पत्र<br>• आम्ही सूचनाफलक वाचतो. | -<br>- | २४ |
| ६. | टप् टप् पडती (कविता) | मंगेश पाडगांवकर | ३२ |
| ७. | आजारी पडण्याचा प्रयोग<br>• आपली समस्या आपले उपाय-१<br>• आम्ही जाहिरात वाचतो. | द. मा. मिरासदार<br>-<br>- | ३७ |
| ८. | शब्दांचे घर (कविता) | कल्याण इनामदार | ४५ |
| ९. | वाचनाचे वेड<br>• आम्ही बातमी वाचतो. | आशा पाटील<br>- | ५० |
| १०. | पंडिता रमाबाई | डॉ. अनुपमा उजगरे | ५७ |
| ११. | लेक (कविता)<br>• आपली समस्या आपले उपाय-२ | अस्मिता जोगदंड-चांदणे<br>- | ६५ |
| १२. | रोजनिशी | - | ७० |
| १३. | अदलाबदल | पन्नालाल पटेल | ७६ |
| १४. | संतवाणी | संत जनाबाई, संत तुकाराम | ८३ |
| | **व्याकरण विभाग** | | ८५ |
| | **लेखन विभाग** | | ९३ |
| | सराव प्रश्नपत्रिका – १ (प्रथम सत्र) | | ११३ |
| | सराव प्रश्नपत्रिका – २ (द्वितीय सत्र) | | ११५ |


टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शविले आहेत.

SAMPLE CONTENT

# २. श्यामचे बंधुप्रेम

**लेखक – साने गुरुजी**

**Summary:**

The lesson 'श्यामचे बंधुप्रेम' is an incident narrated by a well-known social reformer and writer, Sane Guruji. He was born in a poor family. One day, his younger brother asked his mother for a new coat, but she denied saying that his elder brothers would buy it for him once they start earning. When Sane Guruji heard the conversation, he decided to save his pocket money and purchased a coat for his brother. While returning home after making the purchase, he faced many hurdles, including creeping snakes, heavy lightening, etc. But it did not bother him because he was desperate to meet his loved ones. The story highlights a great, heart touching bond between two brothers.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| अस्तर | कपड्याच्या आतील मऊ कापड (lining) |
| आणा | पूर्वीचे एक नाणे (currency coin) |
| ओढ | खेच (pull) |
| कातर स्वर | घाबरलेला आवाज (a worried tone) |
| खुपणे | टोचणे (to prick) |
| गहिवरणे | मन भरून येणे (to be overwhelmed by emotion) |
| गाबड्या | ठिगळ, कापड फाटल्यावर त्या ठिकाणी लावलेले दुसरे कापड (patchwork) |
| गारठा | वातावरणातील अतिशय थंडावा (extreme cold) |
| गंध | वास (smell, fragrance) |
| गंधवती | सुवास असणारी (fragrant) |
| चौघडी | वस्त्राची चार पदरी घडी (four fold) |
| ज्येष्ठ | एक मराठी महिना |
| तप्त, कढत | गरम (hot) |
| दंग | मग्न (engrossed) |
| दवडणे | वाया घालवणे (to waste) |

| | |
|---|---|
| ध्येय | उद्‌दिष्ट (target, goal) |
| धाकटा | लहान (younger) |
| निखारा | विस्तव (a burning coal) |
| निश्चय | निर्धार (determination) |
| पऱ्ह्या | ओढा (brook, rivulet) |
| मेघ | घन (cloud) |
| रम्य | सुरेख (beautiful) |
| वार | कापड मोजण्याचे प्रमाण (unit of measuring cloth) |
| शांतवणे | शांत करणे (to pacify) |
| शिंपी | कपडे शिवणारा (tailor) |
| श्रम | कष्ट (hard work) |
| सदरा | अंगरखा (shirt) |
| सुई | टाके घालण्यासाठी वापरले जाणारे टोकदार साधन (needle) |
| संध्या | येथे उपासना (prayer) |
| स्मृती | आठवण (memory) |
| स्वाद | चव (taste) |

## वाक्‌प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| डोळे अश्रूंनी न्हाणे. | अति आनंदाने डोळ्यांतून अश्रू ओघळणे. (to cry in extreme happiness) |
| दुथडी भरून वाहणे. | पूर्ण भरून वाहणे. (to overflow) |
| फलद्रूप होणे. | फळाला येणे. (to come into reality) |
| रोजगारी होणे. | कामधंद्याला लागणे, कमावते होणे. (to start earning) |

SAMPLE CONTENT

## टिपा

| | |
|---|---|
| गणेश चतुर्थी | गणेश चतुर्थी म्हणजेच भाद्रपद शुक्ल चतुर्थी या तिथीला साजरा करतात तो सण. घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांत श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. |
| दापोली | हे कोकणातील एक पर्यटनस्थळ आहे. हिरव्यागार डोंगररांगांवर ठिपक्यासारखी दिसणारी घरे, मोकळी हवा, विविधरंगी पुष्पसौंदर्य हे दापोली शहराचे वैशिष्ट्य आहे. दापोली तालुक्यातील पालगड येथे साने गुरुजींचा जन्म झाला. |
| पंचमहाभूते | सगळे जग तसेच आपले शरीर हे पृथ्वी, आप (जल), तेज (अग्नी), वायू , आकाश या पाच मूळ तत्त्वांपासून तयार झाले आहे. या पाच तत्त्वांना पंचमहाभूते असे म्हणतात. |

## संकलित मूल्यमापन (Summative Assessment)

### पाठाधारित प्रश्नोत्तरे (Questions Based on lesson)

**प्र.१. खालील आकृती पूर्ण करा.**

*i. श्यामला थंडीच्या दिवसांत न मिळणाऱ्या गोष्टी
१ | २ | ३

ii. श्यामने कोटासाठी केलेली खरेदी
१ | २

*iii. श्यामने आणलेला नवीन कोट बघून त्याच्या आईवडिलांच्या मनात निर्माण झालेले प्रश्न
१ | २ | ३ | ४

iv. पाठात आलेली पक्ष्यांची नावे
१ | २

v. पाठात आलेली नाती
१ | २ | ३ | ४

vi. श्यामच्या आईच्या मते श्याम
- या गोष्टीने मोठा आहे: १
- या गोष्टींनी मोठा नाही: २ | ३ | ४

**उत्तर:**

i. १. मफलर २. जाकीट ३. कोट

ii. १. दोन वार कापड २. अर्धा वार अस्तर

iii. १. कर्ज काढले का? २. फीचे पैसे खर्च केले का?
३. कोणाचे पैसे चोरले का? ४. कोट उधारीवर शिवून आणला का?

iv. १. पिसई २. सोंडेघर

v. १. आई-वडील २. आई-मुलगा ३. वडील-मुलगा ४. भाऊ-भाऊ

vi. १. मनाने २. वयाने ३. पैशाने ४. शिक्षणाने

SAMPLE CONTENT

**प्र.२. सहसंबंध लावा.**

i. फळ : रस :: फूल : .............

ii. पाणी : खळखळ :: वीज : .............

iii. महिना : वर्ष :: आणा : .............

**उत्तर:** i. गंध ii. कडाड् कडाड् iii. रुपया

**प्र.३. कोण ते लिहा.**

i. कोटासाठी हट्ट करणारा –

ii. कपडे शिवणारा –

iii. हिरवा रंग असलेला सापाचा एक प्रकार –

**उत्तर:** i. पुरुषोत्तम ii. शिंपी iii. नानेटी

**प्र.४. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

i. नवीनच पाऊस जेव्हा सुरू होतो, .............

अ. तेव्हा लहान मुलांना आनंद होतो.

ब. तेव्हा तप्त झालेले वातावरण निवळू लागते.

क. तेव्हा मातीचा एक रम्य सुंदर वास सुटत असतो.

ii. वडील दापोलीस आले म्हणजे, .............

अ. आणा - दोन आणे मला खाऊला म्हणून देऊन जायचे.

ब. मला फिरायला घेऊन जायचे.

क. माझी अभ्यासातील प्रगती पाहून आनंदी व्हायचे.

iii. मी मनात ठरवले होते, की .............

अ. यावर्षी स्वत:साठी नवीन कोट शिवून घेईन.

ब. पाऊस जास्त असेल, तर मी घरी जाणार नाही.

क. घरी जाताना भावासाठी नवीन कोट न्यायचा.

**उत्तर:** i. तेव्हा मातीचा एक रम्य सुंदर वास सुटत असतो.

ii. आणा-दोन आणे मला खाऊला म्हणून देऊन जायचे.

iii. घरी जाताना भावासाठी नवीन कोट न्यायचा.

**प्र.५. केव्हा ते लिहा.**

**i. श्याम दापोलीला परत शिकावयास गेला.**

**उत्तर:** मे महिन्याच्या सुट्टीनंतर.

**ii. गावातील मुलांना आईवडील नवीन कपडे शिवतात.**

**उत्तर:** गौरी-गणपतीला.

**iii श्यामला वाटेत जरा भीती वाटली.**

**उत्तर:** नानेटी पायाजवळून गेल्यावर.

**iv. श्यामचे डोळे अश्रूंनी न्हाले.**

**उत्तर:** पुरुषोत्तमसाठी शिवून तयार झालेला कोट हातात घेताच.

SAMPLE CONTENT

**प्र.६. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

***i. नवीन पाऊस सुरू होण्याचा मातीवर काय परिणाम होतो?**

**उत्तर:** उन्हामुळे तप्त झालेली जमीन नवीन पाऊस सुरू झाल्यावर शांत होऊन मातीचा रम्य, सुंदर गंध दरवळू लागतो.

**ii. पुरुषोत्तम कशासाठी हट्ट धरून बसला होता?**

**उत्तर:** पुरुषोत्तम नवीन सदऱ्यासाठी हट्ट धरून बसला होता.

***iii. श्यामने कोणता निश्चय केला होता?**

**उत्तर:** श्यामने आपल्या लहान भावास नवीन सदरा शिवून नेण्याचा निश्चय केला होता.

***iv. लहान भावाला आईने कसे समजावले?**

**उत्तर:** 'जेव्हा अण्णा-दादा मोठे होतील, नोकरी करतील, तेव्हा सहा महिन्यांनंतर ते तुला नवीन सदरा शिवतील तेव्हा आता हट्ट करू नकोस' असे सांगून आईने लहान भावाला समजावले.

**v. श्याम थंडीच्या दिवसांत शाळेत कसा जात असे?**

**उत्तर:** थंडीच्या दिवसांत धोतराची चौघडी करून ती गळ्याशी बांधून श्याम शाळेत जात असे.

***vi. श्यामचे वडील वरचेवर दापोलीला कशासाठी जात?**

**उत्तर:** श्यामचे वडील वरचेवर दापोलीला कोर्ट-कचेरीच्या कामासाठी जात असत.

***vii. श्यामला चालण्याचे श्रम का वाटत नव्हते?**

**उत्तर:** जमवलेल्या पैशांतून लहान भावासाठी शिवलेला कोट आई व भावाला दाखवण्याचा उत्साह व आनंद श्यामला अधिक असल्यामुळे श्यामला चालण्याचे श्रम वाटत नव्हते.

***प्र.७. का ते लिहा.**

**i. श्यामचे डोळे अश्रूंनी न्हाले होते.**

**उत्तर:** श्यामच्या घरची आर्थिक परिस्थिती बेताची होती. त्यांना नवीन कपडे वर्षा-दोन वर्षांनी मिळत असत. कपडे फाटले, तर गाबड्या (ठिगळ) जोडून वापरावे लागत. अशातच श्यामच्या लहान भावाने आईजवळ नवीन कपड्यांसाठी हट्ट धरला. त्यावेळी "तुझे अण्णादादा मोठे होतील, रोजगारी होतील, मग तुला सहा महिन्यांनी नवीन सदरा शिवतील." असे सांगून आईने त्याची समजूत घातली. हे ऐकून श्यामने आपल्या लहान भावाचा हट्ट पुरवण्याचा निश्चय केला. वडील श्यामला वरचेवर जे खाऊसाठी पैसे देत ते त्याने खाऊसाठी खर्च न करता साठवण्यास सुरुवात केली. एक रुपया जमा केला. त्यात दोन वार कापड व अर्धा वार अस्तर विकत घेतले. शिंप्याकडून भावाच्या मापाचा एक छानसा कोट शिवून घेतला.

भावावरील प्रेमापोटी श्यामने सारे प्रयत्न केले होते. लहान भावाची इच्छा पूर्ण करू शकल्यामुळे, जेव्हा श्यामने तयार झालेला तो कोट हातात घेतला तेव्हा त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले.

**ii. श्याम ज्यांच्या घरी राहायचा त्यांनी त्याला 'जाऊ नको' असे म्हटले.**

**उत्तर:** गौरी-गणपतीच्या सुट्ट्या लागताच श्यामला घरातील मंडळींना भेटण्याची ओढ लागली. तो घरी निघाला तेव्हा मुसळधार पाऊस सुरू होता. श्यामच्या घराच्या वाटेत दोन ओढे (पऱ्ह्या) लागत होते. पावसाचा जोर बघता त्या ओढ्यांनाही उतार नसेल हे श्याम ज्यांच्या घरी राहायचा त्यांना माहीत होते. त्यामुळे, त्यांना श्यामची काळजी वाटली म्हणून त्यांनी श्यामला घरी जाऊ नको असे म्हटले.

**iii. पिसईचा पऱ्ह्या दुथडी भरून वाहत होता.**

**उत्तर:** श्याम घरी जायला निघाला तेव्हा मुसळधार पावसामुळे नदीनाल्यांना पूर आला होता. ओढ्यांमध्ये पाण्याची पातळी वाढल्याने त्यांचे पात्र पाण्याने फुलले होते. सलग पाऊस पडत राहिल्याने पिसईचा पऱ्ह्या दुथडी भरून वाहत होता. जणू काही त्याला इतर नदीनाल्यांना भेटायची उत्सुकता लागली होती असे श्यामला वाटले.



SAMPLE CONTENT

**iv. श्यामने सांगितलेली हकिकत ऐकून आईला गहिवर आला.**

**उत्तर:** वडिलांनी खाऊसाठी दिलेले आणे-दोन आणे साठवून श्यामने दोन-तीन महिन्यांत पैसे जमवले. त्यातूनच धाकट्या भावासाठी कोट शिवून आणला. ही सर्व हकिकत आईला समजताच तिला श्यामचे कौतुक वाटले. वयाने, पैशाने, शिक्षणाने जरी श्याम लहान असला, तरी त्याला उमगलेली परिस्थितीची समज मोठी होती. श्यामने खाऊ न घेता भावासाठी एक-एक आणा जमा केला. आपल्या मुलाचे बंधुप्रेम व मनाचे मोठेपण पाहून आईला गहिवरून आले.

**प्र.८. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**i. घरी जात असताना श्यामच्या मनाच्या झालेल्या अवस्थेचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.**

**उत्तर:** श्याम घरी जायला निघाला तेव्हा पावसाळ्याचे दिवस होते. खूप जोरदार पाऊस पडत होता. नद्यांना पूर आलेला होता. श्याम ज्यांच्याकडे राहत होता त्यांनी अडवूनही तो निघाला होता. त्याला घराकडे जाण्याची इच्छा तीव्र होती. त्याच्या मनात आईला भेटण्याची ओढ होतीच, तसेच भावासाठी शिवलेला कोट भावाच्या अंगावर पाहण्यासाठी त्याचे डोळे आतुर झाले होते.

पाण्यातून वाट काढणे बिकट होते; परंतु तरीही न डगमगता श्याम घराकडे जाणारी वाट तुडवत होता. 'पक्ष्याप्रमाणे पंख असते, तर उडतच घरी गेलो असतो' असेही त्याला वाटत होते. वाटेतील खडी त्याच्या पायांना सुयांप्रमाणे टोचत होती. शरीराला कितीही त्रास झाला तरी त्याकडे दुर्लक्ष करत हृदयात प्रेमाचा पूर घेऊन श्याम घराकडे जात होता. अशाप्रकारे मुसळधार पाऊस, नदीनाल्यांचे पूर, अंधार, विजा या सर्व अडचणींवर मात करून श्याम प्रेमाच्या ओढीने घरी जात होता.

**ii. श्याम घरी पोहोचल्यानंतर त्याच्या घरातील वातावरण कसे झाले?**

**उत्तर:** शिक्षणाकरता घरापासून दूर राहणारा श्याम खूप दिवसांनंतर आपल्या घरी जाणार होता. त्यामुळे, घरच्या ओढीने तो भर पावसातून वाट तुडवत घरी पोहोचला. त्याने दारातूनच आईला हाक मारली. लहान भावाने 'अण्णा आला, आई, अण्णा' असे आनंदाने म्हणत दार उघडले. दोघे धाकटे भाऊ भेटले.

श्यामच्या आईवडिलांना एवढ्या पावसातून श्याम घरी आल्याने काळजी वाटली. त्यांचे मन घाबरे झाले. आईने त्याला लगेचच गरम पाण्याने अंघोळ करण्यास पाठवले. मोठ्या भावाने आपल्यासाठी काय आणले या उत्सुकतेपोटी श्यामच्या लहान भावाने त्याचे गाठोडे चाचपण्यास सुरुवात केली.

अशाप्रकारे, श्याम घरी येताच घरातले वातावरण एकदम प्रफुल्लित झाले.

## शब्दज्ञान व व्याकरण (Vocabulary and Grammar)

**प्र.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| i. वडील = | ii. आनंद = | iii. वीज = | iv. महिना = |
| v. दृष्टी = | vi. भीती = | vii. पृथ्वी = | viii. नदी = |
| ix. पाऊस = | x. जमीन = | xi. मेघ = | xii. फूल = |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| i. पिता, पितृ | ii. हर्ष, मोद | iii. चपला, सौदामिनी | iv. मास |
| v. नजर | vi. भय | vii. वसुंधरा, अवनी, धरित्री, वसुधा | |
| viii. सरिता, तटिनी | ix. पर्जन्य | x. धरणी, भू, धरित्री | |
| xi. ढग, जलद | xii. सुमन, कुसुम, पुष्प | | |

***प्र.२. खाली दिलेल्या शब्दांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द चौकटीतून शोधून लिहा.**

थंड, सापडणे, सुगंध, थोरला, जुना, लक्ष, स्मृती

दुर्गंध, विस्मृती, नवीन, गरम, दुर्लक्ष, धाकटा, हरवणे.

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| i. थंड × गरम | ii. सापडणे × हरवणे | iii. सुगंध × दुर्गंध | |
| iv. थोरला × धाकटा | v. जुना × नवीन | vi. लक्ष × दुर्लक्ष | vii. स्मृती × विस्मृती |

SAMPLE CONTENT

**प्र.३. दिलेल्या शब्दांचे लिंग बदला.**

i. आई ii. पुरुष iii. मुलगा iv. शिंपी
v. मित्र vi. नाग

**उत्तर:** i. वडील ii. स्त्री iii. मुलगी iv. शिंपीण
v. मैत्रीण vi. नागीण

**प्र.४. अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. वीज चमकत होती. ii. सदरा शिवून नेला.
iii. सुई पायाला खुपत होती. iv. शेगडीत निखारा ठेवला.
v. रंगीत चित्राचे पुस्तक आणले.

**उत्तर:** i. **विजा** चमकत **होत्या.** ii. **सदरे** शिवून **नेले.**
iii. **सुया** पायाला खुपत **होत्या.** iv. शेगडीत **निखारे ठेवले.**
v. रंगीत **चित्रांची पुस्तके आणली.**

**प्र.५. गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा. तो शब्द गटात का बसत नाही ते सांगा.**

***i. समीरा, विनीता, त्यांनी, निखिल**
**उत्तर:** त्यांनी: कारण 'त्यांनी' हे सर्वनाम आहे, तर इतर सर्व नामे आहेत.

***ii. मी, सातपुते, त्याने, तिला**
**उत्तर:** सातपुते: कारण सातपुते हे नाम आहे, तर इतर सर्व शब्द सर्वनामे आहेत.

***iii. हिमालय, सुंदर, प्रसन्न, भव्य**
**उत्तर:** हिमालय: कारण हिमालय हे नाम आहे, तर इतर सर्व शब्द विशेषण आहेत.

***iv. लिहिणे, आम्ही, गाणे, वाचणे**
**उत्तर:** आम्ही: कारण आम्ही हे सर्वनाम आहे, तर इतर सर्व शब्द क्रियापदे आहेत.

v. **आई, श्याम, पाठविला, पुरुषोत्तम**
**उत्तर:** पाठवला : कारण, 'पाठवला' हा शब्द क्रियापद आहे, तर श्याम, आई, पुरुषोत्तम हे शब्द नामे आहेत.

vi. **कोरडे, दोन, नवीन, कोट**
**उत्तर:** कोट: कारण, 'कोट' हे नाम आहे, तर इतर शब्द विशेषणे आहेत.

***प्र.६. खाली दिलेल्या शब्दांचे क्रियाविशेषण अव्ययांच्या प्रकारांनुसार चौकटीत वर्गीकरण करा.**
तिथे, दररोज, टपटप, क्षणोक्षणी, सावकाश, पलीकडे, अतिशय, पूर्ण, परवा, समोरून, जरा, मुळीच, कसे, वर, थोडा, सतत, झटकन.

**उत्तर:**

| कालवाचक क्रियाविशेषण अव्यये | स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये | रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये | परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये |
|---|---|---|---|
| दररोज, क्षणोक्षणी, परवा, सतत | तिथे, पलीकडे, समोरून, वर | टपटप, सावकाश, कसे, झटकन | अतिशय, पूर्ण, जरा, मुळीच, थोडा |

**प्र.७. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

**i. रोजगारी होणे –** कामधंद्याला लागणे, कमावते होणे.
**वाक्य:** शहरात मोठमोठ्या कंपन्या सुरू होताच अनेक बेकार तरुण रोजगारी झाले.

**ii. दुथडी भरून वाहणे –** पूर्ण भरून वाहणे.
**वाक्य:** सलग तीन दिवस पावसाचा जोर कायम राहिल्याने गावातील नदीनाले दुथडी भरून वाहू लागले.

SAMPLE CONTENT

iii. **डोळे अश्रूंनी न्हाणे –** आनंदाने डोळ्यांतून अश्रू ओघळणे.

**वाक्य:**हुशार अनिलला चांगली नोकरी मिळाल्याचे पाहताच शांताबाईंचे डोळे अश्रूंनी न्हाले.

iv. **भीक न घालणे –** तमा न बाळगणे, पर्वा न करणे.

**वाक्य:** संकटांच्या पर्वताला **भीक न घालता** बचेंद्री पाल हिने एव्हरेस्ट शिखर सर केले.

## मुक्तोत्तरी प्रश्न (Open Ended Questions)

***प्र.१. तुम्ही तुमच्या धाकट्या भावासाठी / बहिणीसाठी कोणकोणत्या भेटवस्तू घेता? कोणकोणत्या प्रसंगी घेता?**

**उत्तर:** मी माझ्या धाकट्या बहिणीसाठी कधीकधी भेटवस्तू घेते. तिला केसांचे चाप, टिकल्या, चपला आणि तिची आवडती पुस्तके मी भेट देते. अनेकदा तिला काय हवे ते विचारून मी तिच्या आवडीची वस्तू भेट देते, त्यामुळे ती खूप आनंदी होते. याव्यतिरिक्त, दरवर्षी तिच्या वाढदिवसाला आणि वार्षिक परीक्षेच्या निकालानंतर मी तिला आवर्जून मोठी भेटवस्तू देते. ती भेट स्वीकारताना तिचा खुललेला चेहरा पाहिला, की मला खूप समाधान मिळते. तिने वर्षभर केलेल्या मेहनतीची ती पोचपावती पाहून ती मला आनंदाने मिठीच मारते.

## आकारिक मूल्यमापन (Formative Assessment)

### मौखिक कार्य (Oral Work)

**प्र.१. तुम्ही कधी स्वत: एखादया गोष्टीचा त्याग करून दुसऱ्याची मदत केली आहे का? वर्णन करा.**

### लेखी कार्य (Writing Work)

***प्र.१. चर्चा करा. सांगा.**

**'पंख असते तर एकदम उडून गेलो असतो' यामागील श्यामची कल्पना काय असावी, याबाबत मित्रांशी चर्चा करा.**

**उत्तर:** पंख ही पक्ष्यांना मिळालेली देणगीच असते. त्यांच्या मदतीने पक्ष्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज जाता येते. 'श्यामचे बंधुप्रेम' या पाठात लहान भावाला दिवाळीला नवा कोट नेऊन देण्यासाठी श्यामची धडपड चालली होती. शिक्षणाकरता बाहेर राहणाऱ्या श्यामला लवकरात लवकर घरी पोहोचून आपल्या भावाच्या चेहऱ्यावरील आनंद पाहायचा होता; मात्र मुसळधार पाऊस, त्यामुळे नदी-नाल्यांना आलेला पूर असे असंख्य अडथळे श्यामसमोर उभे होते. अशा अवस्थेतही आईला आपल्या या कृतीने किती आनंद होईल या विचाराने, घरच्या ओढीने तो चालत होता. त्यावेळी 'पंख असते, तर एकदम उडून गेलो असतो'आणि अंतर केव्हाच पार करत मी घरी पोहोचलो असतो असा विचार श्यामने केला असावा.

**प्र.२. आपल्या सभोवती अनेक गरीब मुले आढळतात. तुम्ही त्यांना कशाप्रकारे मदत कराल?**

**उत्तर:** माझ्या परिसरात काही गरीब मुले राहतात त्यांना मी दरवर्षी माझी आदल्या वर्षीची शाळेची पुस्तके देईन, तसेच त्यांना अभ्यासात काही अडचणी असल्यास त्या सोडवेन. मी माझ्या आईवडिलांसोबत मिळून दसरा-दिवाळी इत्यादी सणांच्या वेळी त्यांना खाऊ आणि नवीन कपडे भेट देईन. या मुलांच्या पालकांना कुठे कायमस्वरूपी रोजगार मिळवून देणे शक्य असल्यास आम्ही मित्र पालकांच्या मदतीने त्यासाठी प्रयत्न करू, जेणेकरून त्यांची परिस्थिती सुधारेल.

### उपक्रम / प्रकल्प (Activity / Project)

**प्र.१. पावसाळा सुरू होताच निसर्गात होणाऱ्या बदलांचे निरीक्षण करा व नोंदवा.**

**प्र.२. पूर परिस्थितीला कसे सामोरे जावे याबद्दल इंटरनेट व तज्ज्ञांच्या साहाय्याने माहिती मिळवा.**

(वरील उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: करावेत.)

SAMPLE CONTENT

# Std. VII




**Available Subjects:**

- English Balbharati
- हिंदी सुलभभारती
- मराठी सुलभभारती
- Mathematics
- General Science
- History & Civics
- Geography

**BUY NOW**

## Salient Features

- Based on the latest syllabus of Maharashtra State Board
- Extensive coverage of textual questions as well as additional question for practice
- Coverage of textual activity based questions to widen the knowledge spectrum of students
- Provision of Chapter wise Assessment in Mathematics, Social Studies and General Science for self-assessment
- A detailed glossary, Summary and Paraphrase is provided for all Chapters and Poems in languages

Target Publications® Pvt. Ltd.

88799 39712 / 13 / 14 / 15

mail@targetpublications.org

www.targetpublications.org